ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २३४४

# डोळे

REFBK-0022317
REFBK-0022317

राम गोसावी

काव्य
संदर्भ
२२३१७
२३४४

# डोळे

राम गोसावी

REFBK-0022317
REFBK-0022317

परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबई ४

प्रकाशक : विष्णु गजानन परचुरे
परचुरे प्रकाशन मन्दिर, मेहता भवन
३११, राजा राममोहन रॉय मार्ग, गिरगांव, मुंबअी ४
मुद्रक : शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय, २९१ शनवार पेठ, पुणे ३०
© राम गोसावी, गोसावी वाडा, ब्राह्मणपुरी, मिरज
प्रकाशन-क्रमांक : ४७१
आवृत्ति पहिली : ६ | १२ | १९७५
मुखपृष्ठ : र. कृ. जोशी
मूल्य : आठ रुपये



माझे उध्वस्त जीवन समर्थपणे सावरणारी व
माझी अंधारातील वाटचाल सुसह्य करणारी
माझी प्रिय पत्नी नलिनी हिला.

## म नो ग त

'डोळे' हा माझा पहिला काव्यसंग्रह रसिकांच्या हाती देताना माझे मन आनंदाने भरून गेले आहे. गेली कित्येक वर्षे उराशी बाळगलेले एक सुखस्वप्न साकार झाल्यामुळे आगळे समाधान मला लाभले आहे.

१९४५ साली कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये असताना कॉलेजच्या वार्षिकात माझी पहिली कविता प्रसिद्ध झाली. तेव्हापासून कवितेने माझ्या जीवनात प्रवेश केला. १९५३ पासून माझ्या काव्यलेखनास थोडी चालना मिळाली. १९६१ साली माझी पहिली कविता 'स्वराज्य'-मध्ये प्रसिद्ध झाली. तेव्हापासून गेल्या १५ वर्षांत माझ्या शे-सव्वाशे कविता मराठीतील प्रमुख मासिकांतून व इतर नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या. परंतु हे सर्व काव्य संकीर्ण स्वरूपात प्रसिद्ध झाल्यामुळे माझ्या कवितेकडे फारसे कोणाचे लक्ष गेले नाही.

१९६५ मध्ये अचानक अंधत्व आल्यामुळे अत्यंत कठीण अशा प्रसंगातून जावे लागले. जीवनातले दुःख, यातना, मान-अपमान असे अनेक अनुभव पचवावे लागले. माणुसकी व जिव्हाळा यांचे दर्शनही अधूनमधून घडले. या विविध अनुभवांतून मनात भावनांचे जे कल्लोळ उसळले ते कवितेतून प्रगट करताना मला विलक्षण समाधान वाटू लागले. कवितेच्या सामर्थ्याची नवी प्रचीती अनुभवास

आली. गेल्या १५ वर्षांत सुमारे २०० कविता लिहून झाल्या. त्यातील निवडक कविता संग्रहरूपाने प्रसिद्ध कराव्या असे तीव्रतेने वाटू लागले. अनेक प्रकाशकांकडे प्रयत्न केले, पण यश येईना. पदर मोड करून संग्रह काढण्याइतकी आर्थिक सुस्थिती नव्हती. त्यामुळे संग्रह काढण्याचे स्वप्न एक दिवास्वप्न ठरू पाहत होते. परंतु मी धीर सोडला नव्हता. माझ्या कवितेवर माझी श्रद्धा होती. प्रत्येक कवितेच्या निर्मितीच्याक्षणी मनास जाणवणारी हुरहूर, तल्लीनता व काव्यनिर्मितीनंतर मिळणारा असीम आनंद मी अनुभवला होता. आज ना उद्या मला न्याय मिळेल असा माझा आत्मविश्वास होता. कमळाच्या पाकळ्यात अडकून पडलेला भ्रमर ज्याप्रमाणे पहाटेची व उगवत्या रविकिरणांची आतुरतेने वाट पहात असतो तशी माझ्या मनाची अवस्था झाली होती. आणि अखेर तो भाग्याचा दिवस उजाडला. २७ डिसेंबर १९७४ रोजी इचलकरंजी येथे भरलेल्या सुवर्ण महोत्सवी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात मला काव्यवाचनाची संधी मिळाली. माझ्या काव्यवाचनाने संमेलनास जमलेल्या हजारो रसिकांची अंतःकरणे हेलावून गेली. संमेलनाचे अध्यक्ष व मराठीतील ख्यातनाम साहित्यिक श्री. पु. ल. देशपांडे यांनी माझ्या काव्याबद्दल उत्स्फूर्त असे गौरव उद्‌गार काढले :

ग्रंथ संग्रहालय ठाणे
22376
वा. क्र.
23
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

" जळगावच्या साहित्य संमेलनाने मराठीस बालकवी मिळाला तर या साहित्य संमेलनाने श्री. राम गोसावी हे नवीन कवी मिळवून दिले. हे या संमेलनाचे मोठे यश आहे." या त्यांच्या उद्‌गाराने माझे मन भारावून गेले. माझ्या अंधारमय आयुष्यातला तो एक सोनेरी क्षण होता. त्यानंतर अनेक मराठी नियतकालिकांतून माझ्या कवितेबाबत गौरवाचे उल्लेख आले. काही प्रमुख वृतपत्रांनी परिचय-लेखही छापले.

माझा काव्यसंग्रह लवकर प्रकाशित होईल अशी प्रसादचिन्हे दिसू लागली. कै. आचार्य अत्रे यांच्या सुविद्य कन्या व 'दैनिक मराठ्या'च्या संपादिका सौ. शिरीष पै यांना माझी वेदना समजली व त्यांनी माझ्या मदतीसाठी धाव घेतली. माझ्या संग्रहातील कविता वाचून त्यातून वेचक कविता या संग्रहासाठी निवडण्याचे बिकट काम सौ. शिरीष पै यांनी पार पाडले. आपल्या वडिलांप्रमाणेच माणुसकी, औदार्य व रसिकता यांचा मधुर संगम सौ. शिरीष पै यांच्या ठिकाणी झाला आहे.

सौ. शिरीष पै यांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल व आपुलकीबद्दल मी त्यांचा शतशः ऋणी आहे. मुंबईतील ख्यातनाम तरुण कलाकार व माझे भाचे श्री. र. कृ. जोशी यांनी संग्रहासाठी अनुरूप मुखपृष्ठ करून दिल्याबद्दल

त्यांनाही मनःपूर्वक धन्यवाद. छपाईचे काम उत्तम केल्याबद्दल सुलभ मुद्रणालयाचे चालक श्री. शशिकान्त देव यांचाही मी आभारी आहे. माझ्या ज्या अनेक मित्रांनी व नातलगांनी माझा संग्रह निघावा म्हणून आस्था दाखविली, तसेच माझ्या कवितांना वेळोवेळी प्रसिद्धी दिल्याबद्दल संबंधित सर्व नियतकालिकांच्या संपादकांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

माझी या संग्रहातील कविता कशी आहे याबाबत मला स्वतःला फारसे सांगायचे नाही. तिचा दर्जा, तिचे गुणदोष तिचे मूल्यमापन रसिकांनीच करावयाचे आहे. उत्कट भावलयींचा प्रभावी शब्दाविष्कार हे चांगल्या कवितेचे लक्षण मानले जाते. या कसोटीस माझ्या कविता कितपत उतरतात हे रसिकांनीच ठरवावे. कविता हा क्षणभर करमणुकीसाठी किंवा प्रसिद्धीसाठी केलेला शब्दांचा खटाटोप नसून माझ्या आशा-आकांक्षा, माझ्या व्यथा, माझी स्वप्ने आणि माझे चिंतन यांना वाचा फोडणारी ती एक प्रभावी माध्यम आहे असे मला अलिकडे वाटू लागले आहे. रंगीबेरंगी विश्वाचे सौंदर्य सुमारे ३९ वर्षे अनुभवीत असताना या कवितेने आपले नाजुक हात माझ्या हाती दिले. त्यानंतर जीवनात अचानक अंधारपर्व अवतरले. सारेच जीवन परावलंबी झाले. या अंधारात मन कित्येकदा

सैरभैर झाले. बरेच विपरीत घडले. परंतु कवितेने माझी साथ सोडली नाही.

या गडद अंधारात चाचपडणाऱ्या, ठेचकाळणाऱ्या आत्म्याला आनंद देणारी ती एक चैतन्यशक्ती आहे याचा आज मी अनुभव घेत आहे.

माझ्या या काहीशा दुर्दैवी जीवनात यश, कीर्ती, पैसा यांच्यापासून मी वंचित असलो तरी कवितेने मला जे आत्मिक समाधान मिळवून दिले ते मी लाख मोलाचे समजतो.

**राम गोसावी**

गोसावीवाडा
ब्राह्मणपुरी
मिरज

दि. २० नोव्हेंबर १९७५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.
ग्रं. शाखा स्थळ ग्रं.

परिचय

कवी राम गोसावी ( रामचंद्र श्रीपाद गोसावी ) यांचा जन्म मिरज येथे ९ डिसेंबर १९२६ रोजी झाला. त्यांचे माध्यमिक शिक्षण मिरज हायस्कूलमध्ये झाले. १९४३ ते १९४५ या काळात त्यांनी कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. पुढील दोन वर्षांचे शिक्षण त्यांनी सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमध्ये पुरे केले. १९४७ साली मुंबई विद्यापीठाची बी. ए. पदवी त्यांनी संपादन केली. १९४७ ते १९४९ या काळात त्यांनी मिरज स्टेट बँकेत नोकरी केली. १९४९ ते १९६५ ह्या सोळा वर्षांत त्यांनी महाराष्ट्र सरकारच्या बांधकाम खात्यातील विद्युत्-विभागात काम केले. १९६५ मध्ये अचानक अंधत्व आल्यामुळे त्यांना नोकरी सोडावी लागली.

सध्या त्यांना अत्यल्प सरकारी पेन्शन मिळते. त्यांची पत्नी सांगलीच्या सर्वोदय हायस्कूलमध्ये नोकरीस आहे. त्यांना एक विवाहित कन्या असून, एक मुलगा व वृद्ध मातोश्री असा परिवार आहे. त्यांचे वडील जुन्या मिरज संस्थानचे पेन्शनर असून नोव्हेंबर १९७४ मध्ये त्यांचे निधन झाले.

१९४५ पासून त्यांना काव्याबद्दल आवड निर्माण झाली. त्यांनी मराठीतील निवडक काव्य वाचले असून विपुल काव्यलेखन केले आहे. त्यांच्या कविता सत्यकथा,

किर्लोस्कर, प्रतिष्ठान, युगवाणी यांसारख्या अनेक दर्जेदार मासिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत.

भावकवितेशिवाय राजकीय, सामाजिक, वैचारिक व कौटुंबिक अशा विविध विषयांवर त्यांनी काव्यलेखन केले आहे. त्यांच्या बालकविता निरनिराळ्या मासिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. ललित व इतर साहित्याची त्यांना आवड असून निवडक साहित्याचे वाचन, चिंतन व मनन करण्यात ते आपला वेळ घालवितात. तोच त्यांचा विरंगुळा आहे.

## अंतरंग


डोळे / १

ताटाटी / ३

उंट / ४

अंधार / ५

दृष्टी / ६

काळोखाची नदी / ७

चौपाटीवर / ८

निद्रिस्त तळ्यात / ९

अंधाराच्या थेंबामध्ये / १०

आभास / ११

विळखा / १२

कळत न कळत / १३

कावळे / १४

हरवले रंग / १५

सापडेना / १६

तुझिया एका... / १७

अरे माझ्या मना / १८

आता सारे निवांत / १९

माझी कळ / २०

आषाढाची सर / २१

चेतना / २२
ओसरले आसू / २३
अखेरीस / २४
प्रकाशाची किनार / २५
ओढ्याच्या काठाशी / २६
माझ्या निळ्या अंगणात / २७
सहवास / २८
किनारा / २९
पंढरीचे वारकरी / ३०
एखाद्याचे नशीब / ३१
रामजन्म / ३२
केले नाही मज / ३३
माझ्या उध्वस्त समाधीवर / ३४
उन्हे होतात तुझ्या... / ३५
वाट / ३६
अतृप्त / ३७
आज काय झाले / ३८
चैत्रोत्सव / ३९
त्या झुलत्या फांद्याखाली / ४०
निरोप / ४१

तिथे... त्या तिथे / ४२
चंद्र असा कललेला / ४३
कृष्णेच्या घाटावर / ४४
मातीमोल जीवन / ४५
चाललो एकला / ४६
व्यर्थ कासावीस / ४७
विरह / ४८
सांजवेळ / ४९
कधी निवतील / ५०
एखादाच / ५१
चुकले पाखरू / ५२
कित्येकदा / ५३
जायचे होते खूप दूर / ५४
शोध / ५५
अंधार गाणी / ५६
मुंबापुरी / ५७
वणवा / ५८
अगतिक / ५९
शब्दगंध / ६०
यात्रा / ६१

उमगले नाही / ६२
स्वरूप / ६३
उजाड / ६४
अंधार / ६६
अंधार सलग जिवलग / ६७

डोळे

काळीज तडफडतंय शब्दरूप व्हायला
प्रेशर कुकरमधल्या वाफेसारखं

वाटलं– ही अर्धीमुर्धी गाथा बुडवावी प्रवाहात
पण इंद्रायणीमाय बोलली रागेजून
" सारे भोग भोगून ये, मगच माझ्या कुशीत ये "
कुणीसं म्हणालं, " काय साब, अक्षी दोनीबी
डोळ्यांना दिसत नाय ? लई वंगाळ बगा.
असं होण्यापरास पटाक्दिशी परान गेलेला
बेस बगा. "

४ जुलै १९६५.... एक भीषण संध्याकाळ
निदान माझ्यापुरती
रस्त्यातून चालता चमकल्या डोळ्यांपुढून
काजव्यांच्या ओळी
आकाशाचं प्रकाशझुंबर कोसळलं खाली
वाटलं... बंद पडलं वीजघर

अंधारात बुडालं सारं शहर
वाटलं, आता सारं संपलं
हॉस्पिटल, डिटॅचमेंट ऑफ रेटिना,
ट्रीटमेंटचा चक्रव्यूह, ऑपरेशन्स, औषधं,
इंजेक्शन्स,
दुःख, छळ, यातना असह्य, प्रदीर्घ.
येशूचं दुःखसुद्धा एक खिळाभर कमी असेल.

पिसाटलेलं मन. झोपेच्या गोळ्या
पाचव्या मजल्याची उंची.
आणखी बरंच काही डोकावून गेलं.
पण अंतरात कुणी तरी दटावलं,
" शोभतं का हे तुला ? "
संसार फुलविणारे तिचे हात अन्
स्वच्छंदी पाखरांचे निष्पाप डोळे
यांची प्रतारणा ?
छे, चुकलो– देवा क्षमा कर–

मी आता राहतो एका अनोळखी ध्रुवावर
जिथं बारा महिने रात्र असते
अन् दिवस रात्रीत बुडाल्यासारखा असतो.
कधी मी असतो भ्रमिष्ट गागारीन
काळ्याभोर ढगात फसलेला
कधी होतो एस्किमो, बर्फाच्या घरात पुरलेला
कधी असतो पेटलेला फिलॅमेंट
दुधी बल्बमधला
छळवादी अंधार-प्रकाशाची आभासरूपं....
अनंत प्रकारची...
आता तूच काठी तूच दिवा
तुझा समर्थ हात हाती हवा.

## ताटातुटी

लाटांच्या ललाटी
काळोख कल्लोळे
गेले पंछी निळे
दूर देशी

वैराण रेतीत
शापित शिंपले
गेले पंछी निळे
दूर देशी

माडांच्या मनीचे
चांदणे मावळे
गेले पंछी निळे
दूर देशी

व्यथित व्याकूळ
घरटे मोकळे
गेले पंछी निळे
दूर देशी

गेले पंछी निळे
आता कैची भेटी
दाटे ताटातुटी
डोळियांत

## उंट

एक अभागी उंट
पायाखाली काळे वाळवंट
चहुकडे अंधार वादळे
प्रकाशाचे मृगजळ
दूरवर कुठे तरी
हिरवी राई
झुलते माड
एखादीच थंडगार पाण्याची ओंजळ
तृषार्त ओठासाठी
एखाद्या अभागी उंटासाठी

## अंधार

तळ्यात अंधार
अंधारात तळं
तळ्यात निळं
मेलेलं कमळ
मेलेल्या कमळात
तडफडतोय भुंगा
थांबव आता प्राणा
थांबव वेडा पिंगा

## दृष्टी

माझीया मनी
खोवून मोरपिसे
लावून पिसे
गेलीस तू निघून
अचानक
माझ्या बेसावध क्षणी
तुझ्या स्मृतीचे चंद्रतुकडे
शोधतोय मी
माझ्या बर्फाळलेल्या
चिरनिद्रिस्त डोळेडोहात
पारदर्शक स्वप्नांच्या हातांनी

**काळोखाची नदी**

काळोखाची नदी
वहाते दुथडी
आता पैलथडी
जाऊ कैसा
बेसूर स्वरांनी
कान जडशीळ
अभंगाची ओळ
ऐकू यावी
उपहास दुःख
कष्ट किती सोसू
एखाद्याचे आसू
माझ्यासाठी
मज गवसेना
चंद्रभागातीर
निदान शिखर
दाखवावे
एका थेंबासाठी
जहालो भिकारी
आलो तुझ्या दारी।
पांडुरंगा

## चौपाटीवर

सळसळती लाट खळकन फुटली
मऊ ओली रेती पायांना बिलगली
थंडगार जलस्पर्शाने अंग कसे सुखावले
भोवतालचे हसरे नाचरे विश्व
क्षणभर साकारले
आंबट तिखट भेळेची चव घेताना
पोराहून पोर झालो
शहाळ्यातले पाणी पिऊन
कोकरासारखा बागडलो
टॅक्सीतून परत फिरताना
मन पुन्हा जड झाले
पिंजऱ्यातील पाखराचे डोळे
चिंब चिंब ओले झाले

## निद्रिस्त तळ्यात

निद्रिस्त तळ्यात शेवाळलेलं पाणी
बेसूर खर्जात बेडकांची गाणी
दाटलेल्या ल्व्हाळ्यात रातकिड्यांची किरकिर
अंधाराला उसवणारी काजव्यांची भिरभिर
झुडपात बरळणारा झपाटलेला वारा
ओलसर पाचोळ्यात सळसळता शहारा
वठलेल्या बाभळीवर फडफडणारं वाघूळ
चिंध्या फाडणारं आभाळ त्यालाही लागलंय खूळ
सारं विश्व कसं उदास व्याकूळ
पहात आहे मुक्तीची वाट
माझ्याही क्षितिजावर उमटेल कधी
हरवलेली सोनपहाट

**अंधाराच्या थेंबामध्ये**

अंधाराच्या थेंबामध्ये
बसतो कोरित
भावफुलांची
नाजुक लेणी
अंधाराच्या थेंबामध्ये
ऐकू येती
पहाटलेली
धूसर गाणी
अंधाराच्या थेंबामध्ये
सृष्टि साजिरी
जाते मजला
हळुच चुंबुनी
अंधाराच्या थेंबामध्ये
विश्वसागरी
माझे मीपण
जाते बुडुनी

**आभास**

ही रुसलेली मुले
ही मंदावलेली फुले
हे निस्तेज दिवे
हे काळोखाचे थवे
ही थबकलेली वाट
ही कोसळणारी लाट
ही गिचमीड अक्षरे
हे विझू घातलेले निखारे
हे सारे सत्य की आभास
हे सारे आभास, हे सारे आभास
सारे जग झगमगणारे
तू फक्त काळोखात बुडणारा

## विळखा

जेव्हा चंद्र होता
जेव्हा चांदण्या होत्या
जेव्हा फुले होती
जेव्हा गंध होता
जेव्हा स्वप्ने हसत होती
अन् गात्रे सुखावत होती
तेव्हा कळले नव्हते मनास
काळोखाचा क्रूर विळखा पडणार आहे
श्वास कोंडणार आहे
स्वप्ने, मनीषा, आशा, इच्छा
सार्‍यांचा चूरचूर होणार आहे

**कळत न कळत**

माझ्या हाती ते पुस्तक देत
आणि पाठीवर थाप मारून
तो हसत खिदळत सहजपणे म्हणाला–
" काय टॉप आहे पुस्तक
एकदा तरी वाचून बघ ना बेट्या "
ते पुस्तक हाती घेतले
एखाद्या षंढापुढे अप्सरा उभी रहावी
तसे क्षणभर वाटले
माझी थरथरती बोटे फिरत राहिली
असहाय्यपणे
त्या गुळगुळीत पुस्तकावर
आणि कळत नकळत
कोसळले दोन थेंब
माझ्या खुळ्या डोळ्यांतून
होऊन अनावर
त्या पुस्तकाच्या पानावर

## कावळे

जेव्हा आभाळाच्या जखमेवरची खपली
गळून पडण्याच्या बेतात असते
आणि शिणलेल्या गात्रावरील निद्रेची मिठी
मधात भिजण्याच्या बेतात असते
तेव्हा ओरडतात कावळे
आणि खातात शिव्या निद्राभंगाबद्दल
सुखी निद्रिस्तांकडून
पण मी मात्र मानतो या कावळ्यांचे आभार
देतो त्यांना धन्यवाद
निःशब्द भयाण अंधाराचा काळाकुट्ट पडदा
टरकावून टाकणारा त्यांचा धारदार आवाज
म्हणजे माझ्यासाठी तो एक दीपस्तंभच
खवळलेल्या अंधारलाटांनी भयग्रस्त झालेल्या
अन् विश्वाच्या दृश्यात्मक स्वरूपाशी
संबंध तुटलेल्या
माझ्या अभागी प्राणाला ते सांगत असतात.
भिऊ नकोस
जवळ आहे किनारा
चैतन्यमय प्रकाशमय किनारा

**हरवले रंग**

हरवले रंग
हरवले रूप
दाखवी स्वरूप
माझे मज
हरवले आकार
हरवले प्रकार
दाखवी प्राकार
चैतन्याचे

हरवल्या दिशा
हरवले आकाश
दाखवी प्रकाश
अंतर्यामी

हरवली दृष्टी
हरवली सृष्टी
करा कृपावृष्टी
विश्वरूपा

तुझ्या कृपेवीण
आयुष्य हे वाया
कोसळो ही काया
तुझे पायी

## सापडेना

धावता धावता
फाटले पाऊल
सुखाचे राऊळ
सापडेना

अंधारी फाटली
डोळ्यांची पापणी
दिव्य रत्नमणी
सापडेना

रसना विटली
शब्द अमंगळ
अमृताची ओल
सापडेना

कैवल्याचा राणा
मनाच्या मंदिरी
भ्रमाच्या बाजारी
सापडेना

**तुझिया एका....**

तुझिया एका फांदीवरती
प्रमत्त झुलतो
रेशिम हिरवा स्वप्नपिसारा
तुझ्याच दुसऱ्या फांदीवरती
उदास झुरतो
स्वप्नभंगला शून्य पसारा
तुझिया एका डोळ्यामधुनी
झुळझुळ वाहे
माणुसकीची अमृतधार
तुझ्याच दुसऱ्या डोळ्यामधुनी
धगधग पेटे
पिशुनतेचा लाल विखार
तुझिया एका लाटेवरती
पंख पांढरा
जहाजपक्षी झुलतो ऐटित
तुझ्याच दुसऱ्या लाटेवरती
गिरक्या घेते
वादळवेडे फुटके गलबत

**अरे माझ्या मना**

विसरण्या दुःख
गर्दीत घुसलो
एकरूप झालो
गर्दीमाजी
हास्यकल्लोळात
बुडे सारे जग
अंतरीची आग
विझेचिना
गर्दीच्या सागरी
माझे क्षुद्रपणा
आले दुणावून
चित्तान्तरी
अरे माझ्या मना
चंचल लहरी
तूच माझा वैरी
भासतोस

**आता सारे निवांत**

आता सारे निवान्त
काळ्या शांत डोहात
विसावे चांदणी
निळ्या स्वप्नछायेत
आता सारे निवान्त

फडफडतात
तृप्तीचे पंख
डहाळीच्या कुशीत
आता सारे निवान्त

मिटलेल्या कळीत
जागवी मिलिंद
गंधमय पहाट
आता सारे निवान्त

ओलावल्या पापणीत
जळते माझ्या
विझल्या स्वप्नांची फुलवात

## माझी कळ

फांदीवर वसंत
हसलाच नाही.
कळीला प्रकाश
भेटलाच नाही.
किनाऱ्याला लाट
शिवलीच नाही.
मातीला जळधार
मिडलीच नाही.
माझी कळ तुला
कळलीच नाही.

**आषाढाची सर**

आली आषाढाची सर
गात मल्हाराचे गीत
ओला चिंब वारा धावे
व्यथा सारी निववीत
चिंब भिजलेली राई
आरशात डोकावते
उफाळले नदीनाले
विसरूनी बंधनाते
भूमी माउलीच्या पोटी
धान्यबीज जोपासले
काळ्या मातीखालुनी
पान हिरवे तरारले
आली आषाढाची सर
जशी लाडकी ही राणी
तिच्यासाठी पारिजात
गुंफितसे फुलवेणी

## चेतना

माझिया आकाशी तुझाच प्रकाश
घाली करपाश प्रेमभावे

माझ्या निरांजनी तूच दिव्य ज्योती
गातसे आरती मांगल्याची

माझिया कुंभात ओतिशी अमृत
केले मी सुकृत पूर्वजन्मी

माझिया वेलीचे तूच गडे फूल
सुगंध चाहूल जीवनात

माझी एकतारी तुझा गोड सूर
लोपले काहूर अंतरीचे

माझिया कुडीची तूच गे चेतना
राहू तुझ्याविना कैसा मी गे ?

**ओसरले आसू**

ओसरले आसू
आता थोडे हसू
काळोखी क्षितिजावर
प्रकाश लागला दिसू
नको आता चिंता
नको रे खिन्नता
निळा-जांभळा डोंगर
उजळला पुरता
आनंदी आनंद
गाऊ मुक्तछंद
दवओली पाखरे
झाली गंधधुंद
उजळले आकाश
पिऊन घे प्रकाश
नको मनी आठवू
सांजवेळ उदास

## अखेरीस

मातीची घागर प्रयासे घडविली
परी ती भंगली अखेरीस

फुगा रबराचा सुरंगी सुंदर
स्पर्शे तीव्रतर नष्ट होई

बर्फाचा तुकडा कितीही जपला
जलरूप झाला क्षणार्धात

झळकते दव तृणपात्यावरी
रवितेजस्पर्शे नष्ट होई

मानवी ही काया मायारूप छाया
जाईल विलया अखेरीस

**प्रकाशाची किनार**

चांदण्या मृदु मखमल
तुझ्या सुगंधी मार्गावर
माझे पाय जळतात पोळतात
तापलेल्या रेतीवर
तुझ्या दारी मांडवावर
जाईची स्वप्नफुले
माझ्या दारी बाभुळझाड
काटेरी काळवंडलेले
तुझ्या सोनेरी पिंजऱ्यात
काकाकुव्याचे मधुर बोल
माझ्या फुटक्या कौलारावर
कावळ्यांचा कोलाहल
तुझ्या क्षितिजावर
गुल्मोहराचा केशरी साज
माझ्या डोळ्यासमोर
गर्द जांभळी तिन्हीसांज
हे सारे ठाऊक असून
सजविलास माझा संसार
माझ्या काळोखी चित्रांना
तुझ्या प्रकाशाची किनार

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. २२३१८ ८१८५ ३३४८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

**ओढ्याच्या काठाशी**

ओढ्याच्या काठाशी वाकला पिंपळ
दाटली सावली शीतळ शीतळ

शीतळ छायेत विसावे गोपाळ
शेज ती सुखाची मखमली हिरवळ

हिरवळ शोभली फुलांची रांगोळी
सुगंध रेंगाळे गाईच्या पाऊली

पिंपळ पायाशी झिंगले मुंगळे
नाचत मजेत वर्तुळ चालले

उंच त्या ढोलीत साठवी गुपीत
सरसरे खारोटी बिजलीच्या नखऱ्यात

माजला भोवती आगीचा कल्लोळ
पिंपळाखालती निवांत शीतळ

**माझ्या निळ्या अंगणात**

माझ्या निळ्या अंगणात
अमृताची बरसात
स्वप्नगीत आळविते
पुनवेची चांदरात
स्वर्गपाखरांचा थवा
येई माझ्या ग अंगणी
झळकती त्यांच्या पंखी
दिव्य तेज रत्नमणी
कधी मेघ साधाभोळा
विसावतो अंगणात
गोड गुपीत अंतरीचे
सांगे माझ्या ग कानात
दिसे माझ्या अंगणात
सप्तरंगाची चाकोरी
सोनियाच्या रथातून
आली कोणाची ग स्वारी

## सहवास

टेकुनि निळसर आभाळाला
निळाजांभळा बसला डोंगर
डोंगर पायापाशी लहरे
नील जलाशय अथांग सुंदर
जळाशयी त्या हसे कमलिनी
निळ्या पाकळी स्वप्ने फुलवित
पाकळ्यांतरी भृंग सुखावे
पंख जयाचे निळसर गंधित
स्वप्न असे हे निळे जांभळे
तुझ्या निरामय सहवासाचे

## किनारा

नाही तुझ्या ओठावरी
डाळिंबाची रक्तलाली

तेथे रांगते सकाळ
लाल लोभस कोवळी

नसेना का तुझ्या देही
सोनचाफ्याची नव्हाळी

माझ्या मनी तुडुंबली
तुझी यमुना सावळी

नाही तुझ्या नयनदळी
मासोळीची चंचलता

तुझ्या स्निग्ध निरांजनी
उजळलो मी पुरता

नाही तुझ्या मनीध्यानी
स्वैरवृत्तीचा पिसारा

माझ्या जीवनगंगेला
तुझा रम्य किनारा

**पंढरीचे**
**वारकरी**

आले हो आले
मेघ जांभळे
गळा शोभते तुळशीची माळ
अंगी दाटला लाल गुलाल
काळ्या कपाळी बुक्का ओघळे
आले हो आले मेघ जांभळे

तालात वाजे झांज चिपळी
हरिनामात वीणा रंगली
मृदुंग बोले विठ्ठल डोले
आले हो आले मेघ जांभळे

आली स्वर्गीची अमृतधार
निवे तापल्या पृथ्वीचा ऊर
नदी नाल्यात जळ खळाळे
आले हो आले मेघ जांभळे

चाले मेघांची आषाढवारी
विठु गजरी धन्य पंढरी
भावभक्तीचे तेज आगळे
आले हो आले मेघ जांभळे.

**एखाद्याचे नशीब**

त्याने जेव्हा जाळे पसरले
तेव्हा पाखरे उडाली होती

त्याने जेव्हा बी पेरले
तेव्हा वर्षा सरली होती

त्याने चित्रासाठी रंग जमवले
तेव्हा उरला होता फक्त काळोख

अखेरीस त्याच्याभोवती गर्दी जमली
तेव्हा तो त्याचा उरला नव्हता

## रामजन्म

भर दुपारी जेव्हा
प्रभुदर्शनाची ओढ लागते
तेव्हा पेटत्या उन्हातून
चंदेरी पुनव बरसते

आणि पेटत्या धरणीवर
प्राजक्ताच्या शीतल पायघड्या
अंथरल्या जातात
काळ्या बुक्क्याने कपाळ माखले असता
अंतरीची किल्मिषे गळून पडतात

अन् लाल गुलालाच्या प्रसन्न धुक्यात
अंतरीच्या कमलकोषात
जन्म घेतात
सद्विचाराचे प्रभु श्रीराम

**केले नाही मज**

केले नाही मज राऊळीचा झेंडा
पालखीचा दांडा करी मज

केले नाही मज माळा वक्षावरी
निदान चव्हरी होऊ दे गा

केले नाही मज चंदनी देव्हारा
होईन अंगारा धूपपात्री

केले नाही मज कुंकुम कोयरी
निदान पायरी होऊन द्यावे

केले नाही मज पूजेसी सहाण
देहाची वहाण पायी तुझ्या

कोणत्याही रूपे करावे जवळ
देह जडशीळ मुक्त व्हावा

## माझ्या उध्वस्त समाधीवर

गर्द काळ्या अंधारात
चमकावा तारा

तप्त कडेकपारीत
झुळझुळावा झरा

वठलेल्या फांदीवर
उमलावं गाणं

आडवळणी डोंगरात
फुलारावं लेणं

विषण्ण आभाळात
शहारावी बिजली

माझ्या उध्वस्त समाधीवर
पसरावी तुझी सावली

**उन्हे होतात तुझ्या....**

उन्हे होतात तुझ्या
केसावर नाचरी
डोळ्यात गहिरी
ओठावर हासरी
वक्षावर लाजरी
कटीवर बावरी
पायावर मोगरी
उन्हे उतरतात जेव्हा
तुझ्या सर्वांगावर
तेव्हा...
उन्हे उन्हेच उरत नाहीत
त्यांचे होते एक भरजरी चांदणे
आणि तू होतेस
एक लयबद्ध लेणे
माझ्या खोल कातळात उमललेले

## वाट

लाल लालडी वाट वाकडी
मुरडत आले पोर चिमखडी

खांद्यावरती हिरवा शेला
तृणांकुरांचा, रानफुलांचा
नाजुक लवचिक उभार बांधा
ठसा मुखावर प्रसन्नतेचा

वारा घाली आम्र प्रियसखा
प्रीती, छाया देत सखीला
किलबिल करती रानपाखरे
हृदयी दाटे हर्ष उमाळा

थांबे अवचित ओढ्याकाठी
ऐकुनि गाणे झुळझुळणारे
शीतल जलस्पर्शाने निवले
गावामधले स्वप्नफुलोरे

## अतृप्त

वासनेच्या काळ्या डोहात
तृप्तीची घागर भरून नेलीस
पण........
मी मात्र राहिलो कोरडाच
फक्त तुझ्या ओलसर पावलांचे ठसे
उमटले माझ्या उजाड छाताडावर
तुला नकळत
तेवढीच खूण
तुझ्या सहृदयतेची
जपून ठेवतो मी
अतृप्तीच्या खोल डोहात

**आज काय झाले**

आज काय झाले
कळेना, कळेना
मनाचा मोगरा
फुलेना फुलेना

पूर्वेच्या आकाशी
रंगली प्रार्थना
मनाचे पाखरू
बोलेना, बोलेना

चंद्र साद घाली
हास गे मोहना
मनाची चांदणी
हसेना, हसेना

## चैत्रोत्सव

जेव्हा मन पेटलेले असते
अन् शरीर फुलून जाते
तेव्हा दृढ होते मिठी
भक्कम पोलादासारखी
पण .... ....
तो क्षणांचा उत्सव
तो चैत्रोत्सव
जेव्हा ओसरतो मावळतो
तेव्हा उरते फक्त
ओली हतबल वाळू
ओहोटीच्या किनाऱ्याची

## त्या झुलत्या फांदीखाली

त्या झुलत्या फांदीखाली
ती पहिलीवहिली भेट
कर करात मिळता जुळता
थरथरले ओठ

त्या झुलत्या फांदीखाली
पसरली फुलांनी शेज
क्षण येता धुंद सुखाचा
नयनात चमकली वीज

त्या झुलत्या फांदीखाली
पाखरास आली नीज
देहाचे बंधन तुटता
गंगेत मिसळले तेज

## निरोप

ओलसर मोगरीच्या फुलापरी
तुझे डोळे पाणावलेले
नारळीच्या झुलत्या पानापरी
तुझा हात अवघडून हाले
खिन्न तू उभी राहिलीस
मर्यादशील दारापाशी
निरोप देताना आणिलेस तू
बळेच हासू ओठाशी
बोलायचे होते पुष्कळ मला
पण गळ्यातला शब्द गळ्यातच विरला
'ज-पू-न र-हा' अडखळले शब्द
मार्ग समोरचा धुक्यात विरला

**तिथे...**
**त्या तिथे**

जिथे...
लाल लोभस अल्लड पायवाट
थबकते जळाशी
उतरणीवरची ओली हिरवळ
खेळते सावलीशी
अवखळ चपळ लाट
घोटाळते भोळ्या खडकाशी
तिथे.... त्या तिथेच
पिवळ्या कण्हेरीखाली
पाहिली मी फुलपाखरे
तुझ्या डोळ्यातली

**चंद्र असा कललेला**

चंद्र असा कललेला
रात्र अशी झुकलेली
उष्ण धुंद निःश्वासे
फुलवेणी सुकलेली

चंद्र असा कललेला
रात्र अशी झुकलेली
आसुरल्या गात्रातुनि
रातराणि फुललेली

चंद्र असा कललेला
रात्र अशी झुकलेली
हृदयाची भावकथा
मीलनात सरलेली

**कृष्णेच्या घाटावर**

सारे कसे शांत शांत कृष्णेच्या घाटावरती
नाही अजून ऐकू आली देवळात काकड-आरती

अजून नाही पडली टिपरी नगारखान्यातील
चौघड्यावर
अजून नाही पाण्याची कावड शंभू महादेवावर

नाही अजून स्नानाची वर्दळ, नाही धुलाईचा
तालध्वनी
काळी चंद्रकळा नेसून लगबग चालली कृष्णाराणी

अजून वाट पाहते कोणाची ? चंद्राची कोर, वेडी पोर
पैलतटावर ज्वारीचे शिवार झोपले बिनघोर

अजून पिंपळ पेंगतो आहे धुक्याची दुलई पांघरून
नाही उमटली सोनेरी किलबिल गर्द हिरव्या राईतून

नाही आला पहाटवारा सुगंधी पंख पसरून
नाही गेली उत्तर रात्र प्रकाशात विरघळून

सारे कसे शांत शांत कृष्णेच्या घाटावरती
मंत्रमुग्ध मी उभा पहाटेच्या सीमेवरती

**मातीमोल जीवन**

माझ्या ओंजळीत फुले येता
त्यांचे होतात काटे
माझ्या स्पर्शाने जळ आटते
उरतात दगडगोटे

मी वर पाहताच फाटते आभाळ
उरतो गडद अंधार
मी खाली पाहताच
खोल दऱ्यांत जळतो अंगार

मी चालू लागताच
सरळ रस्त्याला बारा फाटे
सगळीकडे काटेकुटे
आता जाऊ कुठे ?

माझ्या निःश्वासांनी
सोन्याची माती होते
हे मातीमोल जीवन
सांडू कोठे ?

**चाललो एकला**

वाळली कातडी
वाळली आतडी
होईना ही कुडी
प्राणहीन

फूल गेले तुटून
पान गेले झडून
मूळ परि जळून
जाईना की

संपल्या सुखसरी
शूल सलतो उरी
हास्य ओठावरी
उसनवारी

दीप मंदावला
तिमिर की दाटला
चाललो एकला
शून्यभावे

## व्यर्थ कासावीस

पायावरी तुझ्या
ठेवियला माथा
हाणिल्यास लाथा
केवि ऐशा

झोंबलो गर्दीशी
घ्यावया प्रसाद
छडीचा प्रसाद
पाठीवरी

शांतवाया चित
वाचीयली गाथा
उफाळली व्यथा
अंतरीची

राहो द्यावी माझी
निदान लंगोटी
ती ही गा शेवटी
ओढलीस

देव नोहे हाची
पूजिला खवीस
व्यर्थ कासावीस
कळो आले

## विरह

सावली सरावी
राने विरावी
झरा आटावा
तारा तुटावा
फुल ढळावे
पान गळावे
तुझ्या विरहज्वालेत
मीही जळावे

**सांजवेळ**

झाली सखे सांजवेळ
आकाशाच्या गोकुळात
कृष्ण खेळे रंगखेळ
झाली सखे सांजवेळ

परतीच्या रस्त्यावरी
सोनियाची उडे धूळ
झाली सखे सांजवेळ

शांत शांत नदीकाठी
रानवारा घाली शीळ

**कधी निवतील**

कधी निवतील
हा जळजळणारी गात्रे

कधी सरतील
ही जाळणारी स्वप्ने

कधी संपेल
ही धगधगीत रात

कुठे आहे पहाटवारा
कुठे आहे अंगाईगीत

हे मन, हे शरीर
सारे झाले आहे अधीर

सारे भासत आहे बधीर
कोण मला देईल धीर

कोण मला देईल धीर
कोण मला देईल धीर

## एखादाच

हसणारे सगळेच भेटतात
आसू पुसणारा एखादाच

चुकविणारे अनेक असतात
वाट दाखविणारा एखादाच

पाठीत खंजीर खुपसणारे अनेक असतात
एखादे रक्त असते इमानी

असे थोडे एखादे आहेत
म्हणून जग आहे जिवंत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 22396
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## चुकले पाखरू

चुकले पाखरू
हिंडते आकाशी
संबंध घराशी
तुटलेला

चुकले पाखरू
उरी भयभीत
हरवले गीत
ओठातले

चुकले पाखरू
कोठे त्याची माय
रडे धाय धाय
वेडावून

चुकल्या पाखरा
तुझे माझे आसू
क्षणभर हासू
दोघेजण

कित्येकदा

कित्येकदा रडण्यातसुद्धा सुख असते
घट्ट काळे आषाढमेघ एकदम जावेत फुटून
आणि आभाळ व्हावे मोकळे
तसे—अगदी तसेच
आसवांच्या मुक्त सरी वाहून जाताच
मोकळे होतात डोळे
मन.... ऊर.... गळा होते सारेच मोकळे

**जायचे होते**
**खूप दूर**

जायचे होते खूप दूर
पण रस्ता चुकला आहे
बेत सारे हुकले आहेत
रक्त थिजले आहे
डोळे भिजले आहेत
पाऊल नाही उचलत
ओझे नाही पेलवत
दरीच्या काठी एकटा मी उभा
जाणार होतो खूप दूर
जायचे होते खूप दूर
आता सारे स्वप्नच आहे
दुःखात मी चूर चूर

शोध

गळ्यात घालून काजव्यांची माळ
फिरलो मी रानोमाळ
पण तू सापडला नाहीस

हाती घेऊन नैवेद्य-ताट
पाहिली मी तुझी वाट
पण तू आला नाहीस

धूप, दीप, पूजन, भजन
मंत्र, तंत्र, होम, हवन
पण तुझा प्रतिसाद उमटला नाही

पण एकदा
एका जखमेवर बांधली मी पट्टी
आणि भरविला घास एका भुकेल्या पोटी

तेव्हा घालून मला दाट मिठी
तू म्हणालास– ' मी आलो, मी आलो '

## अंधारगाणी

तळ्यात पाणी
मळ्यात गाणी
गळ्यात राणी
तुझे हात
तुझ्या नेत्री
तुझ्या गात्री
हिंदकळतंय
गुलाबपाणी
माझ्या नेत्री
बसलीत रुतून
आता केवळ
अंधारगाणी

**मुंबापुरी**

हे आवाज कर्कश बेसूर
विजेसारखे तळपणारे
फक्त मध्यरात्री जरासे मलूल होणारे
हे आवाज कर्कश बेसूर
थयथय नाचतो आहे मयासूर
मुंबापुरीच्या काळ्याकुट्ट छाताडावर
हे आवाज़ भेसूर क्रूर
निद्रेसाठी तडफडणारा रडतो आहे ऊर
मेंदूत घुसावी तापलेली सळी
शांततेचा कधीच पडला आहे बळी
शांतीच्या प्रेताभोवती नाचताहेत झिंगलेले यमदूत
हातात जळते पलिते घेऊन
चालला आहे त्यांचा मुंबापुरीचा नाच
हे स्वर उन्मत बेसूर
उन्हात वितळलेले रस्त्यावरचे डांबर
डांबर कसले ? स्वरसुंदरीला पडलेले ते एक विषारी
स्वप्नच
निरागस निष्पाप बालकाच्या अंगावरून
उधळला आहे घोडा चौखूर

## वणवा

आयुष्याचे हे नंदनवन
सारे कसे उध्वस्त उजाड
जळून गेल्या साऱ्या वेली
निष्पर्ण उभे झाडन् झाड
विरून गेले वाऱ्यावरती
कोकिळांचे गहिरे स्वर
सुकून गेले ठायी ठायी
झुळझुळणारे निळे निर्झर
गळून पडली धुळीमध्ये
मयुरांची मोहक पिसे
पाचोळ्यातून भिरभिरताना
वाऱ्यालाही जडले पिसे
दाही दिशांना पेटे वणवा
डोळ्यापुढे अंधार दाट
तरीही धिटाईने तुडवित जातो
काट्याकुट्यांची बिकट वाट
याच वाटेवर एखाद्या झुडपात
हळूच खुणावतात
हसरी फुले
त्यांच्या गंधात बुडून जाताना
मनात क्षणभर नंदनवन झुले.

## अगतिक

देहाच्या पंजरी
पाखरू मनाचे
विभ्रम तयाचे
अलौकिक

अणूंहुनी सूक्ष्म
घेतसे आकार
प्राशिते सागर
क्षणार्धात

तोडोनिया बांध
धावे वायुपरी
घाली वेग फेरी
ब्रह्मांडाशी

पिशाच्च होऊनी
छळीतसे जीवा
मांडी उभा दावा
वैऱ्यापरी

कधी होई माय
देई प्रेमे पान्हा
यशोदेचा कान्हा
झालो मीच

किती रे पाखरा
करावे कौतुक
झालो अगतिक
शब्दावीण

## शब्दगंध

कविता नव्हेच माझी
ही स्निग्ध शांत ज्योत
हिचिया मृदु प्रकाशी
भासे सुरम्य वाट
काटेकुटे कपारी
रोधू शके न कोणी
स्वप्ने उदासवाणी
जाती दुरी पळोनी
दारिद्र्य दुःख भूते
करितात थयथयाट
परि पाहुनि प्रकाश
बसति खरे मुकाट
जड पावले जहाली
पाठी असह्य ओझे
कविता प्रकाशवेडी
मनि मानसी विराजे
आनंद राऊळाशी
हा देह शांत व्हावा
शब्दातला सुगंध
मागे परी उरावा

## यात्रा

बांधोनिया पायी पळसाची पाने
तुडविली राने पेटलेली
थंडी वारा ऊन कशाचे ना भान
निःसंग यात्रिक होऊ पाहे
एका करी लोटा दुज्या करी काठी
कमरेसी लंगोटी ऐसा थाट
वृक्ष छायेखाली निवांतले अंग
आभाळाचे रंग निरखिले
प्राशिले कानाने पाखरांचे गीत
झऱ्यांचे संगीत नादधुंद
मोजके बोलणे मोजकाची घास
राऊळी निवास नदीकाठी
रोज नवा गाव रोज नवी माती
सारी नातीगोती तोडू पाहे
गेले पालटून सारे बाह्यरंग
परी अंतरंग हट्टी राहे
मनी ध्यानी सारा वासनांचा गाळ
तुटेनाही माळ काही केल्या
खऱ्या योग्यासाठी बिकट ही वाट
झाली बनावट माझी यात्रा
व्यर्थ हे भ्रमण व्यर्थ आटापिटा
माझा दाम खोटा कळो आले

**उमगले नाही**

नितळ आभाळात मंद प्रकाशी
खिडकीतून उसळणारी थंडगार हवा
बहरल्या रातराणीतून सुगंधी लहर
पायाशी झुकलेली लाजवंती नजर
पहिल्या रात्रीतील ही पहिलीवहिली भेट
मिठीत तुला घेताना चांदण्यानं घेतला पेट
श्वासात श्वास मिसळताना अंगी फुलारे काटा
किनाऱ्याशी झेपावणाऱ्या प्रमत्त सागरलाटा
देहात मनात गेले भिनून चांदणे काठोकाठ
मिटल्या पापण्यांना उमजले नाही
कधी उमलली कोमल पहाट

## स्वरूप

डोळे जळूनि जाता
अंधार राख उरली
राखेतूनी परी घे
चैतन्य पक्षी उसळी
आकाश वा दिशांचे
गेले तुटूनी बंध
नाही तमा तमाची
धावे दिगंत धुंद
कंठातूनी फुलारे
जयगान जीवनाचे
मेघावरी चितारी
स्वरचित्र तो विजेचे
ती राख ती भरारी
ते गीत पक्षिरूप
त्यांच्यात शोधितो मी
माझे नवे स्वरूप.

## उजाड

हे उजाड माळ
सर्वांगावर धूळ वस्त्रगाळ
खुरट्या गवतावर चरणारी
एक लंगडी गाय
सर्वत्र कडक उन्हाची साय
आभाळाला भिडू पहाणारा
हा उंच लोखंडी मनोरा
त्याच्या डोक्यावर विजेच्या तारांचे जाळे
अंतर्यामी धगधगणारे
पलीकडेच एक बाभळीचे खुरटे झाड
काट्यांची पर्वा न करणारे
पिवळ्या फुलांतून स्मिते उधळणारे
या साऱ्या दृश्यावर माझे नेत्र खिळलेले
येथल्या प्रत्येक वस्तूशी माझे नाते जुळलेले
माझ्या समोरून येणारे हे धूलीचक्र
गरगर फिरणारे
अज्ञाताचा प्रवास करणारे
माझ्या मनातही असेच विचारचक्र
परिभ्रमण करणारे
या विचारचक्रात माझे मन गिरक्या घेते
भिरभिरत जाते दूरदूर
कुठल्या तरी अनोळखी प्रदेशात
निगूढ भावविश्वात
ही अनुभूती पाऱ्यासारखी तरल
धुक्यासारखी विरल

ती साकार करण्यासाठी
सापडत नाही शब्दांचा आधार
क्षणभर मी असहाय, निराधार
हे सैरभैर मन कसे सावरू?
शब्दावाचून त्याला कसे आवरू !
मी विषण्ण, विदीर्ण
शब्दांनो तुमच्यावाचून
माझी व्यथा बोलकी होते
ओलावल्या पापणीतून

## अंधार

अंधाराचे डोही अंधार तरंग
अंधाराचा रंग अंगसंगा
अंगसंग सारे अंधारात भिजे
चैतन्याचे रुजे बीज खोल
चैतन्याचा वेल भिडे गगनाशी
नक्षत्रांच्या राशी पानोपानी
प्राणामाजी आता प्रकाशाचा थाट
माझी मज वाट गवसली

## अंधार सलग
## जिवलग

अंधार
सलग
जिवलग
बिलगतो अंगाशी
गुबगुबीत मांजरीसारखा
पसरतो अंगावर
घनदाट आषाढमेघासारखा
दरवळतो सर्वांगात
गाभाऱ्यातील धूपासारखा
कुरवाळतो
जपून ठेवतो
माझ्या प्रकाशगर्भ अस्थी
बुद्धाच्या स्तूपासारखा

REFBK-0022317
REFBK-0022317